भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०६/२०१७

**१) संगनमत करुन अनोळखी इसमांनी रोडवरील मोटार सायकल चालकांच्या जवळील नगदी पैश्याची थैली व मोबाईल जबरीने हिसकावुन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ ते ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी कमलेश नत्थुलाल गौपाले वय ३८ वर्ष, रा. छतेरा (म. प्र.) हे आपले मोटार सायकलने छतेरा येथुन तुमसर येथे किराणा सामान घेण्याकरीता जात असतांना कवलेवाडा ते चिखला रोडवर फिर्यादीचे मागेहुन तीन आरोपी अनोळखी इसम पल्सर मोटार सायकलने येवुन फिर्यादी जवळील पैश्याची थैली ज्यात नगदी ६३,०००/–रु. व १ सॅमसंग कंपनीचा साधा मोबाईल किंमती १,४५०/–रु. चा असा एकुण ६४,४५० /–रु. चा माल जबरीने हिसकावुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३९२,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे १५.०० ते १५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी ४ वर्ष, ही घराशेजारील आरोपी यांचे घरी टिव्ही पाहण्या करीता गेली असता व आरोपी हा एकटाच घरी हजर असतांना त्याने पिडीत अल्पवयीन मुलीवर लैगिंक हमला करुन तिचे अंगावरील कपडे काढुन तिचेवर अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी पो.स्टे पवनी येथे कलम ३७६(२),(आय),(जे) भांदवी. सहकलम ४,६,८ बाल लैगिंक अत्याचर प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) गैरकायदयाची मंडळी जमवुन रस्त्यावर माती फेकण्याचे कारणावरुन भांडण शिवीगाळ करुन ओढताण करुन मारपीट करुन काठीने हातात मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे २१.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी गंगाराम कचरु सिंगाडे वय ६५ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड ०४ आंधळगाव हा आपले घरी हजर असतांना यातील आरोपीतांनी बेकायदेशीर रित्या जमाव, दंगा करून जाण्या येण्याच्या रस्त्यावर माती फेकण्याचे कारणावरुन भांडण, शिवीगाळ करुन छपरात प्रवेश करुन फिर्यादी छपारातुन अंगणात ओढत आणुन संडास, बाथरुमचे खडयाजवळ नेवुन पुन्हा ओढतान करुन आरोपी क्र. १, २, ३ यांनी थापडाने दोन्ही गालावर कनपटावर मारुन आरोपी क्र. ६ यांनी काठीने उजव्या हाावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. आंधळगाव येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,५०४,४४८,३२३ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २/०६/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही शिकवणी वर्गात जात असतांना यातील आरोपी हा पांढऱ्या रंगाचा मेस्ट्रो मोपेड गाडीने आला व फिर्यादीचे छातीला हाताने थरुन अल्पवयीन फिर्यादीचा विनयभंग केल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४ भांदवि. सहकलम ८ लैगिंक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०६/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले शेतातील आंबे वेचण्यास गेली असता यातील आरोपी हा तिचे जवळ आंबे वेचण्यास आला तेव्हा फिर्यादीने तु आंबे वेचु नको येथुन निघुन जा असे बोलले असता आरोपीने सुना मौका पाहुण फिर्यादीचे डावे हाताचे मनगट पकडुन अश्लिल शब्दात बोलुन विनंयभग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. सिहोरा येथे कलम ३५४(अ),३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) दोन्ही ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे धडक देवुन स्वत:चे मरणास व एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०६/०६/२०१७ चे १०.४५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक हा लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन समोरुन येणाऱ्या ट्रक क्र. सीजी ०४ टीए ११३५ ला धडक दिल्याने ट्रक चालक निरजंन यादव वय २७ वर्ष, रा. नविन नगर पारडी नागपुर याचे मरणास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. इंगोले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा, साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५९ लिटर हातभट्टी दारु+ साहित्य किंमती १६,००/–रु., १६ लिटर २० मिली लीटर किंमती ४,३१८/–रु. असा एकुण किंमती १९,९१८/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.